# एसपी पथकाचे प्रमुख गणेश मुंडे यांची गुंतेगाव गोदापत्रात पहाटे धडाकेबाज कारवाई


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

MO.9860898564

संपादक – दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –६४ | गुरूवार दि.२३ नोव्हेंबर २०२३ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -64 | THURSDAY DT.23 NOVEMBER 2023 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4


## महिलांचे अश्लील व्हिडीओ काढणारा मिल्लीया शाळेतील शिक्षक निलंबित

बीड : शहरातील मिल्लीया ( मुलांची ) शाळा येथील शिक्षक आमेर काझी याने अनेक महिलांचा अश्लील व्हिडिओ तयार केल्याचे प्रकरण समोर आले. याप्रकरणी पोलिसात गुन्हा नोंद झाल्यानंतर संस्थेने आमेर काझी याला तडकाफडकी निलंबित करण्यात आले असून या प्रकरणात जे कोणी दोषी आढळतील त्यांच्याविरुद्ध कडक कारवाई करण्यात येईल अशी माहिती अंजुमन इशात ए तालीम या संस्थेच्या सचिव खान सबीहाबाजी यांनी दिली. संस्थे अंतर्गत असलेल्या शाळांमध्ये अशा प्रकारचे गैरप्रकार कधीही खपवून घेतले जाणार नाहीत आणि कोणालाच माफी नाही असेही त्यांनी सांगितले. बीड शहरातील अंजुमन इशात –ए– तालीम या संस्थेअंतर्गत असलेल्या मिल्लीया मुलांची शाळा येथील शिक्षक आमेर काझी याने महिलेसोबत चा अश्लील व्हिडिओ तयार केल्याचे प्रकरण समोर आले होते. यामध्ये पोलिसात गुन्हा दाखल झाल्यानंतर संस्थेने आमेर काझी याला नोटीस पाठवून २४ तासात खुलासा मागवला होता. काझी याने सादर केलेला खुलासा अमान्य करत संस्थेने आमेर काझी यास तात्काळ निलंबित केले. या प्रकरणांमध्ये कायदे तज्ञांची टीम गठीत करण्यात आली असून पुढील कायदेशीर कार्यवाही सुरूच राहणार आहे. त्याचबरोबर अश्लील व्हिडिओच्या संदर्भात जे कोणी दोषी आढळतील त्यांच्याविरुद्ध देखील संस्था कडक आणि शासनाचा सेवा शर्ती नियमानुसार कारवाई करणार असल्याचे संस्थेच्या सचिव खान सबीहाबाजी यांनी सांगितले. बीड शहरातीलच नव्हे तर जिल्ह्यातील पालकांनी, समाजसेवकांनी, सामाजिक कार्यकर्त्यांनी आणि विशेषतः माध्यमांनी नेहमीच संस्थेला सहकार्य केलेले आहे. या सर्वांच्या बळावरच आज ही संस्था नावा रूपाला आलेली आहे.

# छगन भुजबळ भाजपच्या वाटेवर

## मनोज जरांगेच्या दाव्यावरून राजकारण तापणार

**मराठा आणि ओबीसी आरक्षणावरून मागच्या काही दिवसांपासून मनोज जरांगे पाटील आणि मंत्री छगन भुजबळ यांच्यात जोरजार खडाजंगी सुरू आहे. दोन्ही नेत्यांनी एकमेंकांवर बोचरी टीका केली होती. त्यामुळे राज्यात तणावाची स्थिती निर्माण झाली आहे. दरम्यान त्यांच्यातील आरोप प्रत्यारोप आता राजकीय व्यासपीठावर पोहोचले आहेत. छगन भुजबळ भाजपच्या वाटेवर असून लवकरच ते पलटी मारतील असा दावा जरांगे यांनी केल्यामुळे राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे.**

**मनोज जरांगे पाटील सध्या अहमदनगर दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यावेळी त्यांनी भुजबळ यांच्यासंबंधित हा दावा केला आहे. छगन भुजबळ यांना भाजपने ऑफर दिली असेल. त्यामुळे गृहमंत्री त्यांना काही बोलत नाहीत की थांबवत नाहीत. मराठा समाजाला त्रास देण्यासाठी काही ठरलं आहे का, अशी शंका येत आहे. त्यांना पलटी मारायची सवय आहे. आतापर्यंत**



**त्यांनी दहा ते पंधरा पलट्या मारल्या आहेत, असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.**

मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याची मागणी आहे. तर ओबीसी कोट्यातून मराठा समाजाला आरक्षण देण्यास ओबीसी समाजाने विरोध दर्शवला आहे. त्यावरून मनोज जरांगे पाटील आणि मंत्री छगन भुजबळ एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करतायेत. दरम्यान जरांगे पाटील यांच्या तिसऱ्या टप्प्यातील दौऱ्याची आज बिड जिल्ह्यात सांगता होणार आहे.

फलक फाडल्यामुळे काहीही होणार नाही, त्यामुळे मराठा समाजाने शांतता राखली पाहिजे. मात्र, राज्यातील कायदा आणि




सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी गृहमंत्र्यांची आहे. त्यांनी याकडे लक्ष दिले पाहिजे. तसेच देवेंद्र फडणवीस यांच्या मनात नेमकं काय आहे, हे त्यांनी एकदा सांगून टाकावं. कारण अंबडमध्ये झालेल्या ओबीसी सभेचा एकही बॅनर कोणी फाडला नाही. त्यांना सरकारचे पाठबळ असेल, अशा आरोप जरांगे यांनी केला आहे.

## मोबाईल च्या फोटोवरून बीडच्या आरटीओलाच दिली पीयुसी

### तिघांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल

बीड – बीडच्या आरटीओलाच बनावट पीयुसी दिल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. बीड आरटीओ अधिकारी गणेश विघ्ने यांनी ग्राहक बनून हा प्रकार उघडकीस आणला याप्रकरणी तिघांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काही दिवसांपूर्वी अति प्रदूषणामुळे दिल्लीमधील शाळा, कॉलेज बंद केले होते. यामुळे प्रशासनाने प्रदूषणाला कारणीभूत ठरणाऱ्या व धुराच्या धूळकांड्या सोडणाऱ्या वाहनांवर कारवाईचे आदेश दिले होते. महाराष्ट्रात सर्वच जिल्ह्यात वाहनांची तपासणी न करताच वाहनाला पीयुसी प्रमाणपत्र दिले जाते. या पीयुसी केंद्राची कोणतीही तपासणी व त्यांना नियमांचा कसलाही धाक नसल्याने व्हॉट्सप फोटो वरून पीयुसी ही योजना राज्यभर चालू असल्याचे दिसते. महाराष्ट्र आरटीओ चे अप्पर परिवहन आयुक्त यांनी अशा बोगस आणि बनावट पीयुसी चालकांवर तपासण्या करून गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले होते. याबाबत सविस्तर माहिती अशी की, महाराष्ट्र आरटीओचे अप्पर परिवहन आयुक्त यांच्या आदेशावरून बीडचे आरटीओ अधिकारी गणेश विघ्ने यांनी स्वतः ग्राहक म्हणून बऱ्याच ठिकाणी अशा पीयुसी सेंटरवर बनावट पीयुसी घेतल्या. गाडी चक्क





**आरटीओ अधिकारी गणेश विघ्ने यांनी ग्राहक बनून केले स्टिंग ऑपरेशन**

बीड मधील वजन काट्यावर आणि १०० किलोमीटर दुरून त्याचवेळी व्हाट्सप वरून फोटो व पैसे घेऊन पीयुसी दिली. याबाबतचे व्हिडिओ सहित ऑपरेशन आरटीओ अधिकारी गणेश विघ्ने यांनी केले. २०० रुपये पाठवा तुम्हाला पाच मिनिटात पीयुसी व्हॉट्सप वर पाठवतो, असे घोडके याने आरटीओ अधिकारी गणेश विघ्ने यांना सांगितले. त्यानंतर पीयुसी सेंटरच्या मालकाने पीयुसी प्रमाणपत्र जारी केले. गुन्हा सिद्ध होण्यासाठी वाहनाचा वजन काटा इन कॅमेरा केला त्या अनुषंगाने पाडळसिंगी टोल नाक्यावरील या बनावट पीयुसी देणाऱ्या विरोधात वाहन क्रमांक चक-०४ क्ष १८२१, चक-११ ढ ७९२७ व चक-२३ ए ९३१९ यांना बनावट पीयुसी दिल्याने बीड ग्रामीण पोलीस स्टेशन मध्ये पीयुसी केंद्र चालक परमेश्वर मेंडके, करण घोडके, राहुल घोडके यांच्यावर भा.दं.वि. मधील कलम ४२०, ३४, ४६८, ४७१ मधील कलमानुसार शासनाची फसवणूक केल्याचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास फौजदार वैभव रणकुंभ करीत आहेत.

**श्री पंकज कुमावत यांना अंबाजोगाई येथे**

## अतिरिक्त पोलीस अधीक्षक पदी नियुक्ती झालेली असताना त्यांच्या नियुक्ती दोन दिवसातच स्थगिती च्या मागे कोणते अदृश्य हात





लोक जनशक्ती पार्टी

अंबाजोगाई : अंबाजोगाई विभागामध्ये मोठ्या प्रमाणात अवैध धंदे सुरू आहेत त्यातच श्री पंकज कुमावत यांची अंबाजोगाई येथे अतिरिक्त पोलीस अधीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली त्यामुळे आंबेजोगाई उपविभागांमध्ये उत्सवाचे वातावरण होते की श्री पंकज कुमावत यांच्या माध्यमातून आंबेजोगाई उपविभागातील अवैध धंद्यांना आळा बसेल अंबाजोगाई उपविभागातील जनतेला वाटत होते परंतु त्यांना रुजू न होऊ देतात त्यांच्या बदलीला स्थगिती देण्यात आल्यामुळे अवैध धंदेवाल्यांना पाठबळ मिळालेले आहे आंबेजोगाई उपविभागात सध्या मोठ्या प्रमाणात गुटखा विक्री मटका पत्त्यांचे क्लब वाळूची अवैध वाहतूक गांजा गौण खनिज उत्खनन चोरटी रेशन वाहतूक सुरू आहे व श्री पंकज कुमावत यांच्याकडे मराठा आंदोलनावेळी बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात अनेक आमदार विविध पक्षांचे जिल्हाध्यक्षांच्या हॉटेल ची जाळपोळ करण्यात आली त्या जाळपोळीचे तपासी अधिकारी म्हणून अप्पर पोलीस अधीक्षक श्री पंकज कुमावत साहेब असल्यामुळे त्याचे खरे गुन्हेगार गळाला लागण्याची शक्यता असल्याने त्यांच्या बदलीस जाणीवपूर्वक स्थगिती देण्यात आली स्थगिती देऊन अशा कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याला बीड जिल्ह्यातून कोण हाकलून देत आहे आशी चर्चा आंबेजोगाई उपविभागात तसेच बीड जिल्ह्यात होत आहे यांची लवकरात लवकर स्थगिती उठवली गेली नाही तर लोक जनशक्ती पार्टीच्या वतीने एक जन आंदोलन पेटवण्यात येईल याची नोंद प्रशासनाने घ्यावी तसेच पत्र उपजिल्हाधिकारी कार्यालय अंबाजोगाई यांच्यामार्फत केंद्रीय गृहमंत्री अमितजी शहा यांना देताना लोक जनशक्ती पार्टीचे मराठवाडा प्रदेशाध्यक्ष राजेश वाहुळे बीड जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर गोरे अंबाजोगाई तालुका अध्यक्ष अशोक काळे अंबाजोगाई शहराध्यक्ष प्रदीप बीड जिल्हा कार्याध्यक्ष दिनेश घार नाना देवकाते भैय्या बिडगर देवा चमनार अकबर शेख अक्तर शेख अझहर सय्यद सह अन्य जणाणी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.



## लिंबागणेश गावची ग्रामसभा फक्त कागदोपत्रीच...!

**वर्षभरात एकही ग्रामसभा नाही ..**

लिंबागणेश ।हरिओम क्षीरसागर

बीड तालुक्यात असणारे लिंबागणेश गाव असून सदरील गावची लोकसंख्या हि ३००० ते ४००० एवढी आहे .ग्रामपंचायतीबाबत राज्य शासनाने एक महत्वाचा निर्णय घेतला आहे. तो म्हणजे आता ग्रामपंचायतीकडून घेतल्या जाणाऱ्या ग्रामसभेचा व्हिडीओ– ऑडिओ केले जाणार आहे. याबाबत राष्ट्रीय ग्रामस्वराज्य अभियानाचे राज्य प्रकल्प संचालक आ. सु. भंडारी यांनी सर्व जि.प.च्या ग्रामपंचायत विभागाला सूचना दिल्या आहेत. राज्यातील सर्व जिल्हा परिषदांसाठी हे आदेश काढण्यात आलेलाआहे. मात्र लिंबागणेश ग्रामपंचायत कडून या आदेशाची अंमलबजावणी झालेली दिसून येत नाही. कारण ग्रामीण भागाच्या विकासात ग्रामपंचायत सर्वात महत्त्वाची आहे. गावकऱ्यांना मुलभूत सोयी– सुविधा उपलब्ध करुन देण्याबरोबर गावच्या विकासाचे कार्य ग्रामपंचायतीच्या माध्यमातून होते. प्रत्येक ग्रामपंचायतीने वर्षभरात किमान चार ग्रामसभा घेणे बंधनकारक असते. मात्र, अनेक ग्रामपंचायती ग्रामसभा प्रत्यक्षात न घेता, केवळ कागदोपत्री दाखवत ग्रामसभा गुंडाळल्या जात असतात. त्यात अपवाद म्हणजे लिंबागणेश ची ग्रामसभा , अशा प्रकारांना चाप लावण्यासाठी ऑडिओ रेकॉर्डिंग केले जाणार होते. केंद्र व राज्य शासनाकडून वित्त आयोगाच्या निधीतून ग्रामपंचायती अधिक सक्षम केल्या जात आहे. मात्र अनेक ग्रामपंचायती वित्त आयोगाच्या निधीचा गैरवापर करतात.तसेच ग्रामसभांमध्ये १५ व्या वित्त आयोगाच्या निधी खर्चाची माहितीही दिली जात नाही. त्यामुळे आता शासनाने घेतलेला नवीन निर्णय गावाच्या विकासासाठी फायद्याचा ठरणार आहे की लिंबागणेश गावासारखे त्या आदेशाची अंमलबजावणी होत नाही असा ग्रामस्थांना प्रश्न पडला आहे..?


## एसपी पथकाचे प्रमुख गणेश मुंडे यांची गुंतेगाव गोदापत्रात पहाटे धडाकेबाज कारवाई


**पहाटे केलेल्या कारवाईमुळे वाळू तस्कराचे धाबे दणाणले ; पावणे दोन कोटीचा मुद्देमाल जप्त**

गेवराई । प्रतिनिधी

चकलांबा पोलीस ठाण्याचे प्रमुख नारायण एकशिंगे व पोलीस अधीक्षक पथकाचे प्रमुख गणेश मुंडे यांना गोदापात्रांमध्ये अवैध वाळूचे उत्खनन होऊन त्याची बेकायदेशीर चोरटी वाहतूक होत असल्याबाबतची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार दोन्हीही अधिकाऱ्यांनी संयुक्त सापळा रचून गुंतेगाव नदी पात्रात पहाटे ४:३० वाजता अचानक टीमसह धाड टाकली असता नदीपात्रामध्ये वाळू वाहतूक करण्याच्या उद्देशाने आलेला एक हायवा, चार टिपर व त्यांचे ड्रायव्हर, तसेच मोठ्या प्रमाणावर उत्खन केलेला वाळू साठा नदीपात्रात मिळून आला असून पुढील कायदेशीर कारवाई चालू आहे. भले पहाटे केलेल्या कारवाईमुळे वाळू तस्कराचे धाबे दणाणले आहेत.

सदरची ही कारवाई आज दि.२३ नोव्हेंबर रोजी पहाटे ४:३० वाजता पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश




मुंडे, पोह /वायबसे, आरसीपी कडील जवान तसेच चकलांबा पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी नारायण एकशिंगे, पीएसआय आनंता तांगडे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक चांदमारे, पोह / येळे., पोलीस कॉन्स्टेबल खटाणे, सुरवसे, पवळ यांनी केली आहे.



वसुंधरारत्न,राष्ट्रसंत परमपूज्य डॉ शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर यांच्या पायी दिंडी चे स्वागत करुण आशिर्वाद घेताना आदरणीय नंदकिशोरजी मुंदडा (काकाजी)व ईतर मान्यवर .

## अंबाजोगाई अपर जिल्हाधिकारी कार्यालयात पोलीस पाटील पदाचे आरक्षण सोडत

बीड :बीड जिल्हयातील सर्व उपविभागातील पोलीस पाटील रिक्त पदे भरण्याबाबत कालबध्द कार्यक्रम जाहीर झाला असून कालबध्द कार्यक्रमाच्या अनुषंगाने अंबाजोगाई उपविभागातील संबंधित गावातील रिक्त असलेल्या पोलीस पाटील पदाचे गावनिहाय आरक्षण जाहीर करावयाचे आहे.

अंबाजोगाई उपविभागातील केज आणि अंबाजोगाई या दोन तालुक्यामध्ये मिळून एकूण १९७ पोलीस पाटील यांचे पदे रिक्त असून ज्या गावातील पदे रिक्त आहेत ते विचारात घेवुन लोकसंख्येच्या टक्केवारी आधारे प्रवर्ग निहाय आरक्षण व त्यामधून ३० टक्के महिला आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे.

सदर प्रवर्ग निहाय आरक्षण दि. ५ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर जिल्हाधिकारी कार्यालय, यशवंतराव चव्हाण चौक, अंबाजोगाई येथील हॉलमध्ये काढण्याचे निश्चित केले असून पोलीस पाटील पद रिक्त असलेल्या गावातील नागरीकांनी आरक्षण सोडतीस उपस्थित राहता येईल, असे अंबाजोगाई उपविभागीय कार्यालयाचे, उपविभागीय दंडाधिकारी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# संविधान के सन्मान में हम सब भारतीय मैदान में २५ नोव्हेंबरच्या मुंबई येथील रॅलीत लाखोच्या संख्येने सहभागी व्हा - प्रा.बालाजी जगतकार

## संविधान सन्मान रॅली चे नेतृत्व ड.प्रकाश आंबेडकर व तमाम भारतीय

बीड/प्रतिनिधी

ड.प्रकाश आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मुंबई येथे संविधान सन्मान महारॅली व सभेत उपस्थित राहून ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार व्हा! २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतात संविधान लागू झाले म्हणून २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो भारतीय संविधान आणि घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सन्मानार्थ भारतीय संविधान दिन देशभरात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो आपले संविधान भारताला सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही प्रजासत्ताक घोषित करते येथील नागरिकांना न्याय, समानता आणि स्वातंत्र्य आणि बंधुत्वाला



चालना देण्यासाठी प्रयत्नांची हमी देते. आपल्या संविधानाने देशातील प्रत्येक नागरिकाला स्वतंत्र भारतात राहण्याचा समान अधिकार दिला आहे. संविधानाची मूल्ये व मुलभूत अधिकार रूजवणे हा संविधान दिन साजरा करण्यामागचा मुख्य हेतू आहे पण आज घडीला भारतात संविधानाची मूल्ये व नागरिकांचे मुलभूत अधिकार हिरावून घेतले जात आहेत संविधान जाळणे व संविधान बदलण्याची भाषा येथील मनुवादी व्यवस्था करत आहे. भारताचे संविधान हाच आमुचा अभिमान भारतातील प्रत्येक नागरिकाचा सन्मान, गौरव आणि अभिमान हा भारतीय संविधानामुळेच आहे आणि संविधान आहे म्हणून आज देशात लोकशाही टिकून आहे व ती टिकून ठेवण्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने २५ नोव्हेंबर २०२३ रोजी मुंबई येथे संविधान सन्मान महारॅली व जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे ही जाहीर सभा छत्रपती शिवाजी महाराज पार्क दादर मुंबई येथे दुपारी ४ वाजता होणार आहे तरी बीड जिल्ह्यातील सर्व बहुजन समाज बांधवांनी व संविधान प्रेमी यांनी ड.प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये होत असलेल्या संविधान सन्मान महारॅली व जाहीर सभेसाठी लाखोच्या संस्थेने उपस्थित राहावे असे बीड जिल्हा प्रसिद्धी प्रमुख प्रा.बालाजी जगतकर यांनी एका पत्रकाद्वारे केले आहे.

# बोगस बियाणे विरोधातील कायद्यांचा निविष्ठा विक्रेत्यांना त्रास होणार नाही- कृषिमंत्री धनंजय मुंडे

परळी / प्रतिनिधी

राज्यातील अप्रमाणित आणि बोगस बियाण्यांपासून शेतकऱ्यांची होणारी फसवणूक रोखण्यासाठी राज्य शासनाने प्रस्तावित केलेल्या कायद्यातील दुरुस्तीनंतर कृषी निविष्ठा विक्रेत्यांना कोणताही त्रास होणार नाही, असे स्पष्टीकरण कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिले.

राज्य शासनाच्या प्रस्तावित कायदेदुरुस्तीनंतर कृषी निविष्ठा विक्रेत्यांविरुद्ध होणाऱ्या संभाव्य कारवाई बाबत महाराष्ट्र फर्टीलायझर पेस्टिसाइड सीड्स डीलर असोसिएशन यांनी राज्यभरात निविष्ठा विक्री बंद



ठेवण्याचे आंदोलन सुरू केले होते. त्यावेळी कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे कृषी निविष्ठा विक्रेता संघटनेशी संपर्क साधून आंदोलन मागे घेण्याचे आवाहन केले

# शहरवासीयांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा- थोरले पाटंगण संस्थानच्या वतीने आवाहन

**बीड ।प्रतिनिधी**

**येथील श्रीसंत जनीजनार्दन स्वामी महाराज थोरले पाटंगण संस्थान यांच्या ४२२ वा प्रतिवार्षिक महोत्सवानिमित्त कार्तिक शुद्ध अष्टमी सोमवार दिनांक २० ते कार्तिक वद्य द्वितीया बुधवार दि. २९ नोव्हेंबर २०२३ दरम्यान संपन्न होत आहे. स्वामींच्या वार्षिक महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात महिला, पुरुष भाविकभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन थोरले पाटंगण संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.**

आज गुरुवार दिनांक २३/११/२०२३ सकाळी ८.०० वाजता महान्यास अभिषेक, दुपारी साडेबारा वाजता स्वामींची आरती संध्याकाळी सहा वाजता नादब्रह्म भजन सेवा सादर होणार आहे. शुक्रवार दिनांक २४ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी आठ वाजता महान्यास अभिषेक दुपारी साडेबारा वाजता आरती, दुपारी चार वाजता श्रीमद्जनीजनार्दन संस्थान आयोजित श्रीमद् भगवद्गीता वय वर्षे ०८ ते १८ आणि १८ वर्ष ते पुढील वयोगटातील स्पर्धकांसाठी पाठांतर स्पर्धा परीक्षा संपन्न होत असून परिक्षक म्हणून वेदांत वाचस्पती डॉ. दिनेशराव रसाळ, ह.भ.प.श्री.एकनाथ महाराज पुजारी, वे.मू.कृष्णा रामदासी, वे.मू.किरण गोसावी (अथर्ववेद) आदींचे लाभणार आहे.शनिवार दिनांक २५/११/२०२३ सकाळी आठ वाजता महान्यास अभिषेक दुपारी १२.३० वाजता आरती दुपारी चार वाजता श्रीसंत जनी जनार्दन संस्थान आयोजित श्रीमद् भगवद्गीता पाठांतर स्पर्धा परीक्षा होणार आहे. रविवार दिनांक २६/११/२०२३ रोजी सकाळी ८.०० वाजता महान्यास अभिषेक, दुपारी साडे बारा वाजता स्वामींची आरती तर दुपारी ३.०० वाजता विद्वमणी पुरस्कार प्रदान सोहळा पुरस्कारार्थी प्रो. पराग जोशी (कवी कालिदास युनिव्हर्सिटी,नागपूर) यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार असून दुपारी ३.०० वा. विद्यावाचस्पती डॉ.दिनेश रसाळ यांचे विशेष व्याख्यान संपन्न होत आहे. मागील वर्षी डॉ. दिनेश रसाळ यांना हा पुरस्कार देण्यात आला तर यावर्षी प्रो. पराग जोशी नागपूर यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.सोमवार दिनांक २७/११/२०२३ महान्यास अभिषेक, दुपारी साडेबारा वाजता आरती, संस्थानचा कुलधर्म कुलाचार व महा अभिषेक, वे.मु.शैलेश कुलकर्णी (ऋग्वेद), वे.मु. ज्यो. कृष्णा पात्रुडकर (यजुर्वेद), वे.मु.महेश पांडव (सामवेद) यांच्या नेतृत्वाखालील चतुर्वेद पारायण समाप्ती. मंगळवार दिनांक २८ रोजी सकाळी ठीक नऊ वाजता आचार्य श्री अमृताश्रमस्वामी महाराज (श्री अमृत महाराज जोशी) यांचे काल्याचे किर्तन होणार असून दुपारी एक ते पाच महाप्रसाद होणार आहे. बुधवार दिनांक २९ नोव्हेबर रोजी सकाळी सहा वाजता मठाधिपती यांचे लळीताचे कीर्तन संपन्न होणार असून संस्थानच्या महोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या सर्वच कार्यक्रमाचा महिला, पुरुष भाविकभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थानच्या वतीने मठाधिपती श्री. विनायक धुंडीराजशास्त्री पाटंगणकर, पाटंगणकर, माळेवाडीकर परिवार, पाटंगणकर शिष्य परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

येथील श्रीसंत जनीजनार्दन स्वामी महाराज थोरले पाटंगण संस्थान यांच्या ४२२ वा प्रतिवार्षिक महोत्सवानिमित्त कार्तिक शुद्ध अष्टमी सोमवार दिनांक २० ते कार्तिक वद्य द्वितीया बुधवार दि. २९ नोव्हेंबर २०२३ दरम्यान संपन्न होत आहे. स्वामींच्या वार्षिक महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात महिला, पुरुष भाविकभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे .

# जालना येथील आमरण उपोषणाला वडवणी तालुक्यातुन सकल ब्राम्हण समाजाचा जाहीर पाठिंबा

**वडवणी ।प्रतिनिधी**

**जालना येथील गांधी चमन येथे दिनांक २८ नोव्हेंबर २०२३ पासून बेमुदत आमरण उपोषणा ला दिपकभाऊ रणनवरे हे बसणार आहेत.गेल्या अनेक वर्षांपासून ब्राह्मण समाजाच्या वतीने सतत निवेदने दिलेले आहेत, आंदोलनही करण्यात आले आहे पण शासन दरबारी काही केल्या निर्णय घेण्यात आला नाही.पण आता तरी लवकरात लवकर ब्राह्मण समाजाच्या मागण्या मान्य करण्यात याव्या नाहीतर प्रत्येक जिल्ह्यातील, तालुक्यातील शेकडो लोक रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करण्याचाइशारा वडवणी तालुक्यातील सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने देण्यात आलाआहे.**

शिक्षण घेण्यासाठी, व्यवसाय सुरू करण्या साठी,ब्राम्हण समाजाची आर्थीक परिस्थीती हालाखीची आहे त्यामुळे सर्वसामान्य ब्राह्मण समाजाच्या बेरोजगार तरुणांसाठी परशुराम अर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात यावे. अशी मागणी केली आहे आणी लवकरच आपण शासन दरबारी निर्णय घ्यावा.नाही तर रस्त्यावर येऊन आंदोलन केले नंतर होणाऱ्या परिस्थीतीला सरकार जबाबदार राहील.

या आमरण उपोषणाला वडवणी तालुक्यातील वडवणी,पिंपरखेड, चिचाळा,पुसरा,कवडगाव, चिंचवण,देवडी,केसापुरी परभणी, साळींबा अशा अनेक गावांतील ब्राह्मण समाज मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहे .कालीदास देवा रत्न पारखी,गणेश देवा जोशी, दिंगाबर जोशी,योगेश देवा जोशी चिंचाळकर,दत्तात्रय रत्नपारखी,प्रदिप देवा जोशी,प्रमोद देवा जोशी, कालीदास देशमुख, अमोल कुलकर्णी के.प. दत्तात्रय देवा पिंपरखेड, कुलकर्णी सर,सखाराम देवा पाठक के,प,मोहन देवा चिंचवण,मदनदेवा चिंचवण,अरुण देवा कवडगाव,श्रीनिवास देवा पुसरा,धनंजय कुलकर्णी, मुकुंददेवा जोशी,आशोक देवा बाहेगव्हाण,श्रीकांत जोशी,सतीशराव देशमुख, सतिश सर देशमुख, कव्हाळे देवा,व इतर अनेक गावांतील ब्राह्मण समाजाचे बंधु जालना येथील आमरण उपोषणा ला उपस्थित राहणार आहेत.

## परळी औ.वि.केंद्रात नव्याने रुजू झालेले शरद राठोड यांचा कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनच्या वतीने स्वागत

परळी ।प्रतिनिधी

परळी औष्णीक विद्युत केंद्रात नव्याने रुजू झालेले सहाय्यक कल्याण अधिकारी शरद राठोड रुजू झाल्याबद्दल थर्मल पॉवर स्टेशन कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन ॲण्ड सप्लायरच्या वतीने राठोड यांचे प्रशासकीय इमारतीत दि. २१ नोव्हेंबर रोजी स्वागत करण्यात आले. नुकतेच ते भुसावळ येथून परळीला रुजू झाले असून त्यांचे असोसिएशनचे अध्यक्ष अंगदभाऊ हडबे त्यांच्या संघटनेच्या पदाधिकार्यांनी स्वागत केले. यावेळी थर्मल पॉवर स्टेशन कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन ॲण्ड सप्लायरचे पदाधिकारी शिवाजी बिडगर, भगवान साकसमुद्रे, रमेश सरवदे, काटमोरे, राजन, संजय व्हावले, कातकडे, मधु नाईकवाडे, आदी उपस्थित होते.

## शुक्रवारी बीडमध्ये मध्यम, लघु आणि सुक्ष्म उद्योग परिषद

बीड/प्रतिनिधी

उद्योग संचनालय यांच्यावतीने मध्यम, लघु आणि सुक्ष्म उद्योग परिषद शुक्रवारी हॉटेल ग्रँड यशोदा,बार्शी रोड येथे आयोजीत करण्यात आली आहे.या परिषदेसाठी नोंदणी सकाळी ९.३० ला सुरूवात होणार. या परिषदेचे महत्व सांगुन जिल्हाधिकारी दिपा मुधोळ-मुंडे या बीड जिल्ह्यातील मध्यम, लघु आणि सुक्ष्म उद्योग (एमएसएमई) यांना प्रोत्साहन देण्यासंदर्भातील रोड मॅप वर बोलतील.

## शासन आपल्या दारी कार्यक्रमाची तारीख बदलली

# आता २७ ऐवजी ३ डिसेंबर रोजी होणार भव्य कार्यक्रम

परळी / प्रतिनिधी

शासन आपल्या दारी हा कार्यक्रम आता पुढे ढकला असून २७ नोव्हेंबर रोजी होणारा कार्यक्रम पुढील महिन्यात ते डिसेंबर रोजी होणार असल्याचे समजते याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अशा प्रकारच्या सूचना तहसील कार्यालयाला प्राप्त झालेल्या आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की शासन आपल्या दारी या कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस दुसरे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि पालकमंत्री व कृषीमंत्री ना. धनंजय मुंडे तसेच मराठवाड्यातील सर्व मंत्री यांच्या उपस्थितीत लाभार्थ्यांना त्यांच्या लाभाचे वितरण करण्यात येते. तसेच शासनाच्या



विविध योजनांची माहिती या कार्यक्रमाच्या निमित्ताने जनतेला देण्यात येते.

हा कार्यक्रम परळी तहसील कार्यालयासमोरील भव्य अशा प्रांगणात २७ नोव्हेंबर रोजी होणार होता. परंतू हा कार्यक्रम काही कारणास्तव आता पुढील महिन्यात ३ डिसेंबर रोजी निश्चित करण्यात आला आहे. याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अशा प्रकारच्या सूचना प्राप्त झाल्याचे नायब तहसीलदार बी.एल. रुपनर यांनी सांगितले.

शासन आपल्या दारी हा कार्यक्रम आता पुढे ढकला असून २७ नोव्हेंबर रोजी होणारा कार्यक्रम पुढील महिन्यात ते डिसेंबर रोजी होणार असल्याचे समजते याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अशा प्रकारच्या सूचना तहसील कार्यालयाला प्राप्त झालेल्या आहेत.

# तहसीलदार यांच्या आदेशाला केराची टोपली

## पथक नावालाचं तहसिलदार माजलगावलाचं !

माजलगाव : प्रतिनिधी

तालुक्यातील रिधोरी शेलगाव हिवरा बादली वाळुघाटात रात्रनं दिवस राजरोसपणे वाळू वाहतूक चालु आहे तरी माजलगाव तहसिलदार याकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे मोठ्या थाटामाटातमध्ये बैठे पथकांची नेमणूक केली आहे तरी वार नेमुन दिल्याले पथक फक्त नावालाचं तहसिलदार मात्र माजलगावलाच दिसुन येत आहे परंतु रात्रंदिवस चालु घालून असलेल्या वाळु उपशावर कडी नजर ठेवून ना रात्र दिवस पाहात घनसावंगी चे पथक व तहसीलदार कळसकर मॉडम डोळ्यात तेल घालून लक्ष देत आहेत परंतु ते वाळुमाफिया बीड जिल्हात व माजलगाव तालुक्यात हायदोश माजवत आहे याकडे मात्र तलाठी फक्त नावालाच कोतवाल आपल्याचं गावालाचं तर तहसीलदार माजलगाव गोदामाईचे लचके तोडणार्या वाळुमाफियावर माजलगाव तहसिलदार याकडे कानाडोळा का करतात या कडे रिधोरी व शेलगावक-यांचे लक्ष लागून आहे

माजलगाव तहसिलदार यांने कार्यवाही न केल्यास गोदामाईत नग्न आंदोलन करण्यात येईल असे गावकऱ्यांनी प्रतिनिधीसी बोलताना सांगितले .



# दिवाळी संपली....ग्रामीण भागात बसफेऱ्यांचा अभाव : आगाराचे व्यवस्थापन कोलमडले

पाचोड।प्रतिनिधी

दिवाळीचा सण संपताच गावाकडे आलेले प्रवाशी अन् चाकरमानी आपल्या कामावर परतू लागले आहेत. त्यामुळे बुधवारी दि,२२ रोजी पाचोड ता.पैठण बसस्थानकात प्रवाशांची मोठी गर्दी झाली होती. बसमध्ये जागा मिळावी यासाठी बसस्थानकात बस आल्यानंतर प्रवाशांची झुंबड उडत आहे. यात आगाराचे व्यवस्थान कोलमडल्याचे दिसून येत आहे. गेल्या दोन ते तीन वर्षात एसटी महामंडळ मोठ्या आर्थिक विवंचनेत सापडला होता. मात्र यावर्षी दिवाळी एसटी महामंडळाला पावली असल्याचे दिसून येत आहे. सध्या प्रत्येक बस प्रवाशांनी खचाखच भरून जात आहेत. एसटी महामंडळाने अनेक ठिकाणी प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन जादा गाड्या सोडल्या असल्या तरी त्या पुरेशा नसून

## पाचोड बसस्थानकावर प्रवाशांची गर्दी उसळली



प्रवाशांची संख्या लक्षात घेऊन नियोजन करणे अपेक्षित होते.

परंतु असे होत नसल्याने प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. त्यातच दिवाळी सणानिमित्त गर्दी होत असल्याचे दिसून येत आहे. सध्या दिवाळीचा सण संपला आहे. दिवाळी सणासाठी गावी आलेले प्रवाशी व चाकरमानी आता आपल्या कामावर परतू लागले आहेत. त्यामुळे सध्या भाडेवाढीनंतरही पाचोडच्या बसस्थानकात गर्दी कायम असल्याचे दिसते. बसगाड्या फुल्ल भरून जात सोमवारपासून दररोज बसस्थानकात प्रवाशांची मोठी गर्दी झाल्याचे पाहायला मिळत आहेत.पाचोडचे बसस्थानक हे जवळपास ६० ते ७० खेडेगावांसाठी मध्यवर्ती ठिकाण आहे तसेच या बसस्थानकातून राज्यात किंवा परराज्यात कुठेही आणि केव्हाही जाता येते. त्यामुळे खेडेगावात आलेला प्रवासी किंवा चाकरमान्यांला त्याच्या कामाच्या ठिकाणी परत जाण्यासाठी पाचोड बसस्थानकातच यावे लागते. एसटी महामंडळाने बसच्या भाड्यामध्ये १० टक्क्यांची वाढ केली आहे. याचाही फायदा एसटी महामंडळाला झाला आहे. त्यामुळे बऱ्याच कालखंडानंतर एसटी महामंडळाला चांगले दिवस आले संख्या पाहता उपलब्ध ब असल्याचे दिसून येत आहे. प्रवाशांची संख्या पाहता ग्रामीण भागात बसफेऱ्या नसल्याचे चित्र आहे.

दिवसांपासून पाचोड बसस्थानकात प्रवाशांची मोठी गर्दी दिसून येत आहे. बसस्थानकात बसगाडी आली की बस पकडण्यासाठी प्रवासी बसच्या पाठीमागे पळत जात आहेत. कारण येणारी बस प्रवाशांनी भरून येत आहे. त्यामुळे बसस्थानकात बसची वाट वाहत थांबलेल्या प्रवाशांना बस पकडण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे.पाचोडःदिवाळीच्या सुट्या संपल्यानंतर गावी जाण्यासाठी बसस्थानकावर प्रवाशांची गर्दी होत आहे. (छाया अनिस कुरैशी पाचोड)

# अनधिकृत फेरीवाल्या विरोधात मोठी तपासणी मोहिम

## ६१ अनिधिकृत फेरी वाल्या वर कारवाई

नांदेड (प्रतिनिधी)

दिनांक २१ आणि दिनांक २२ नोव्हेंबेर, २०२३ रोजी रोजी श्री नागेंद्र प्रसाद, वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक, नांदेड यांच्या देखरेखी खाली अनधिकृत फेरी वाल्या विरोधात मोठी तपासणी मोहीम हाती घेण्यात आली होती यात दिनांक २१ नोव्हेंबर रोजी नांदेड विभागात धावणाऱ्या विविध रेल्वे गाड्या तपासण्यात आल्या. या तपासणी मोहिमेत श्री नागेंद्र प्रसाद, वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक, नांदेड यांच्या सह ०४ तिकीट तपासनि स्कॉड सहभागी झाले होते. यात ५४ अनधिकृत फेरी वाल्या विरोधात कार्यवाही करण्यात आली आणि २१,०५०/- रुपये दंड वसूल




करण्यात आला.

दिनांक २२ नोव्हेंबर रोजी नांदेड रेल्वे स्थानकावर सचखंड एक्स्प्रेस मध्ये ०७ अनधिकृत फेरी वाल्या विरोधात कार्यवारी करण्यात आली आणि २१,०५०/- रुपये दंड वसूल करण्यात आला. श्रीमती नीति सरकार,विभागीय रेल्वे व्यवस्थापक नांदेड यांनी प्रवाशांना आव्हान केले आहे की प्रवाशांनी अनधिकृत फेरी वाल्यांकडून कोणतेही पदार्थ घेवू नयेत

# जायकवाडीचा मृतसाठा वापरावा

## जिल्हाधिकारी शर्मा यांचा गोदावरी महामंडळाकडे स्पष्ट अभिप्राय



यंदा अपुरा पाऊस पडल्याने धरणांमध्ये पुरेसा पाणीसाठा नाही. अशा परिस्थितीत मराठवाडा व नाशिक-नगर असा पाण्याचा संघर्ष उभा राहिला आहे. जायकवाडी प्रकल्पाच्या मृत साठ्यातून २०१५ मध्ये ०.५ टीएमसी पाणी वापरण्याची परवानगी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने दिली होती.

त्याचप्रमाणे मृत साठ्यातून २०१२, २०१५ व २०१८ मध्ये सुमारे दहा टीएमसी पाण्याचा वापर करण्यात आला आहे. याच मृत पाणीसाठ्याचा वापर पुन्हा केल्यास नाशिकमध्ये पाणीटंचाई निर्माण होणार नाही, असा स्पष्ट अभिप्राय जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाकडे नोंदविला आहे.

पाणी संघर्षात गोदावरी पाटबंधारे विभागाने नाशिक शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या गंगापूर धरणातून ५०० दशलक्ष घनफूट पाणी सोडण्याचे आदेश दिल्याने तीव्र झालेल्या संघर्षात मराठवाड्यातील नेत्यांचा पाणी हिसकावून घेण्यासाठी आततायीपणा दिसून येत असल्याचे स्पष्ट झाले आहे. २०१२ व २०१५ मध्ये जायकवाडीचा मृत पाणीसाठा उचलला असताना नाशिकच्या पाचशे दशलक्ष घनफूट पाण्यासाठी दबाव आणला जात आहे.

यंदाच्या हंगामात नाशिक जिल्ह्यातच अपुरा पाऊस पडला. जवळपास ३० ते ३५ टक्क्यांची पाण्याची तूट निर्माण झाली. त्यामुळे काही धरणे फुल असली तरी बरीचशी धरणे निम्मीदेखील भरली नाहीत. मराठवाड्याला पाणीपुरवठा करणाऱ्या जायकवाडी धरणासाठी गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाने पाण्याचे सूत्र ठरवून दिले आहे.

जायकवाडी धरणात पाण्याची ठराविक टक्केवारी असल्याने पाण्याचा कोटा पूर्ण करण्यासाठी नाशिक व नगरच्या धरणांमधून पाणी सोडावे, असे गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाचे सूत्र आहे. त्यानुसार नगरमधील निळवंडे धरणातून ८.६ टीएमसी, तर गंगापूर धरणातून ०.५ टीएमसी पाणी सोडण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

परंतु या निर्णयाला उच्च न्यायालयात हरकत घेण्यात आली. गंगापूर धरणातून ०.५ टीएमसी पाणी सोडण्यास आमदार प्रा. देवयानी फरांदे यांनी विरोध केला आहे. पाणी सोडण्यास विरोध नाही, परंतु गंगापूर धरणात अपुरा पाणीसाठा असल्याने दारणा धरणातून पाणी सोडावे, अशी त्यांची मागणी आहे. या विरोधात उच्च न्यायालयात धावदेखील घेण्यात आली आहे. ५ डिसेंबर २०२३ ला न्यायालयात पुन्हा सुनावणी आहे.

निळवंडे धरणातून जायकवाडीसाठी ८.६ टीएमसी पाणी सोडण्यासंदर्भात दाखल हस्तक्षेप याचिकेवर सुनावणी देताना सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला आहे. त्यामुळे जायकवाडीसाठी निळवंडे धरणातून पाणी सोडण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

परंतु यापूर्वीदेखील टंचाईची परिस्थिती निर्माण झाली असताना मृत साठ्यातून पाणी उपसण्यास परवानगी असताना नाशिक व नगरच्या पाण्यासाठी हट्ट व गोदावरी पाटबंधारे विकास मंडळाकडून पाणी सोडण्यासाठी तत्काळ पावले उचलण्यात आल्याने गोदावरी पाटबंधारे विभागाने २०१२ व १५ मधील आदेश दाबून ठेवण्यावर संशय व्यक्त होत आहे.

# मराठवाड्यातील ग्लोबल आडगाव चित्रपटाची गोव्यात हवा



परळी / विकास वाघमारे
(दै. महाभारत)

इफ्फीच्या ५४ व्या गोवा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये मराठवाड्यातील लेखक, दिग्दर्शक, आणि निर्माते तसेच बहुसंख्य कलाकार असलेल्या ग्लोबल आडगावचीच हवा होताना दिसत आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने गोवा आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिवल मध्ये फिल्म बाजार साठी ग्लोबल आडगाव ची निवड केली होती.

जागतिक पातळीवरील प्रतिष्ठित अशा गोवा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात ग्लोबल आडगाव चित्रपटाला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.न्यूझीलंड, उत्तर कोरिया, रशिया अमेरिका, नायझेरिया येथील फिल्मेकर ने उदंड प्रतिसाद दिला ग्लोबल आडगाव च्या निवडीची घोषना सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केली. मनोज कदम निर्मीत व प्रसिद्ध लेखक, दिग्दर्शक अनिलकुमार साळवे लिखित-दिग्दर्शित,अमृत मराठे सह-निर्मित ग्लोबल आडगाव गोव्यात रंगणाऱ्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात महाराष्ट्र शासनाने फिल्म मार्केटसाठी निवडला आहे. सोबतच गिरकी आणि बटरफ्लाय हे मराठी चित्रपटांचीही निवड करण्यात आली आहे.

अमेरीकेत नुकताच ग्लोबल आडगाव या अनिलकुमार साळवे लिखित-दिग्दर्शित मराठी चित्रपटाचा बेस्ट रायटर अवॉर्ड पुरस्काराने सन्मान करण्यात आला आहे.ग्लोबल आडगाव चित्रपटाच्या कथा-पटकथा-संवाद लेखनासाठी प्रख्यात सिने-दिग्दर्शक अनिलकुमार साळवे यांना ऑस्करच्या धर्तीवर बेस्ट रायटर सन्मान मिळाला आहे. गोवा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात ग्लोबल आडगावचा सन्मान म्हणजेच भारतीयांचा बहुमान होय.

आंतरराष्ट्रीय सन्मान प्राप्त लेखक अनिलकुमार साळवे दिग्दर्शित आणि शेतकरी पुत्र ,उद्योजक मनोज कदम निर्मित व अमृत मराठे सहनिर्मीत व डॉ. सिद्धार्थ तायडे सहदिग्दर्शित रानबा गायकवाड अभिनित ग्लोबल आडगाव मराठी चित्रपट लवकरच रुपेरी पडद्यावर झळकणार आहे.

अभिनेत्री किशोरी शहाणे, प्रसाद नामजोशी, हर्षित अभिराज, समीर आठल्ये आणि संदीप पाटील यांच्यासह पाच सदस्यांच्या तज्ज्ञ समितीने ३० चित्रपटामधून या चित्रपटाची काळजीपूर्वक निवड केली होती. आपली जोरदार कथा आणि कलात्मक उत्कृष्टतेमुळे ग्लोबल आडगाव या प्रतिष्ठित चित्रपट महोत्सवात स्थान मिळाले आहे. यंदा चित्रपटप्रेमिंच्या वर्तुळात 'ग्लोबलआडगाव' या मराठी चित्रपटाची सकारात्मक चर्चा आहे.

# धनगर समाज मोर्चातील प्रक्षोभक भाषणांची नोंद

## २५०० जणांवर गुन्हे; तोडफोड, दगडफेकीत सुमारे एक लाख रुपयांचे नुकसान

प्रतिनिधी । जालना

धनगर समाजाला अनुसूचित जमाती आरक्षणाची (एसटी) अंमलबजावणी करण्यात यावी, या मागणीसाठी मंगळवारी जालन्यात मोर्चा झाला. हा मोर्चा झाल्यानंतर निवेदन घेण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ मोर्चाच्या ठिकाणी न आल्याने संतप्त झालेल्या मोर्चेकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर दगडफेक केली. तसेच दोन चारचाकी गाड्यांच्या काचा व मुख्य प्रवेशव्दारे तोडले. दरम्यान, तोडफोड,दगडफेक होण्याअगोदर झालेल्या प्रक्षोभक भाषणांची नोंद घेऊन तोडफोड केल्याप्रकरणी ३६ जणांसह दोन ते अडीच हजार मोर्चेकऱ्यांविरोधात तालुका पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मोर्चा आल्यानंतर या ठिकाणी सभेत रुपांतर झाले. या ठिकाणी अनेक मान्यवरांची भाषणे झाली. परंतु, सभेनंतर जिल्हाधिकारी यांनी समाज बांधवांचे निवेदन स्विकारायला यावे, अशी मागणी मोर्चेकऱ्यांकडून केल्या जात होती. यासाठी काही वेळ मोर्चेकरी थांबले होते. परंतु, जिल्हाधिकारी हे निवेदन स्वीकारण्यासाठी न येता त्यांनी इतर अधिकारी पाठवल्याने संतप्त झालेल्या जमावाने जिल्हाधिकारी कार्यालयाचे लोखंडी गेट तोडले. आंदोलनकर्त्यांना पोलिस थांबण्याचे आवाहन करीत होते. परंतू, कोणत्याच आंदोलनकर्त्यांनी पोलिसांकडे लक्ष न देता जिल्हाधिकारी कार्यालयावर दगडफेक, चारचाकी, दुचाकींची तोडफोड केली. यात अनेक वाहनाधारकांचे नुकसान झाले आहे. या प्रकरणात सहायक पोलिस निरीक्षक संदीप सावळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात १४३, १४६, १४७, १४९, ४२७, ५०४, ५०६ भादवि सहकलम ३ व ४ सार्वजनिक मालमत्ता हानी प्रतिबंधक कायदासह कलम ७ सुधारित फौजदारी कायद्याअन्वये गुन्हा



दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलिस निरीक्षक जनार्दन शेवाळे हे करीत आहेत.

तोडफोड, दगडफेकीत सुमारे एक लाख रुपयांचे नुकसान

जिल्हाधिकारी कार्यालयात घुसून काही तोडफोड, दगडफेक केल्याने सुमारे १ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. यात दोन गाड्यांच्या काचा व जिल्हाधिकारी इमारतीच्या काचा फुटल्या आहे. तर परिसरात ठेवण्यात आलेल्या कुंड्यांची तोडफोड करण्यात आली आहे. यात १ लाखांचे नुकसान झाल्याची नोंद करण्यात आली आहे.

यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल : जिल्हाधिकारी कार्यालयात तोडफोड, दगडफेक करून नुकसान केल्याप्रकरणी दीपक बोराडे, कपिल दहेकर, पांडुरंग कोल्हे, शिवाजी भालेकर, गोविंद जाधव, बळीराम खटके, भगवान माथले, निखिल वीर, बाळासाहेब तायडे, शिवाजी तरवडे, नितीन कानडे, गणेश कोल्हे, अक्षय आटोळे, शिवराम विर, संतोष कोल्हे, भगवान कावळे, जनार्दन सोरमारे, सोपान भांड, कैलास गोरे, कारभारी आडने, जनार्दन जारे, कैलास चोरमारे, विष्णू श्रावणे, अशोक गायकवाड, कृष्णा खरात, गणेश होळकर, शंकर मुळे, उध्दव पवार, तान्हाजी शेंडगे, भगवान पाटोळे, रोहन खैरे, रामभाऊ गोरे, रोहीत सुरडकर, शिवप्रसाद चितळकर, बाबासाहेब जोशी, शरद चोरमारे इतर दोन ते अडीच हजार जणांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.


# राज्यात आजपासून ४-५ दिवस पावसाची शक्यता

## मुंबई, रत्नागिरीला यलो अलर्ट

महाराष्ट्राला पुन्हा एकदा अवकाळी पावसाचा तडाखा बसण्याची शक्यता आहे, आजपासून राज्यात पुढील ४-५ दिवस पावसाचा अंदाज भारतीय हवामान विभागाकडून वर्तविण्यात आला आहे. यानुसार कोकण , मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात पावसाची शक्यता आहे. तर २५ आणि २६ नोव्हेंबर रोजी मुंबईसाठी यलो अलर्ट देण्यात आला आहे.

२५-२६ नोव्हेंबरला मुंबईसाठी यलो अलर्ट

२५ आणि २६ नोव्हेंबर रोजी मुंबईसाठी यलो अलर्ट देण्यात आला असून या ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पावसाचा इशाराही देण्यात आला आहे. तसेच मुंबईत पावसाचा अंदाज असल्याने हवा गुणवत्ता पातळी चांगली होण्याची शक्यता आहे. पश्चिम



महाराष्ट्रातील काही भागात विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता तर उत्तर महाराष्ट्रात देखील विजांच्या गडगडाटासह पाऊस असेल. सोबतच, उत्तर महाराष्ट्रात अगदी तुरळक ठिकाणी गारा पडण्याची देखील शक्यता वर्तविण्यात आली आहे. रब्बीच्या हंगामात शेतकऱ्यांचा पुन्हा अवकाळीशी सामना होणार आहे.



पंढरपूर (सोलापूर) : मराठा समाज आणि कोळी समाजाच्या प्रचंड विरोधानंतर प्रशासनाच्या मध्यस्थीने अखेर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या हस्ते सपत्निक विठ्ठलाची शासकीय महापूजा संपन्न झाली आहे. विशेष म्हणजे फडणवीस मुख्यमंत्री असतांना देखील त्यांच्या हस्ते आषाढीला विठ्ठल मंदिरात महापूजा झाली होती. तर, दुसऱ्यांदा कार्तिकी आषाढीच्या निमित्ताने फडणवीस यांच्या हस्ते महापूजा झाली आहे. दरम्यान, महाराष्ट्रातला प्रत्येक व्यक्ती सुखी झाला पाहिजे हेच विठुरायाकडे मागणं असल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे.



# संभाजीनगरात 'बीसीसीआय'चे सामने

छत्रपती संभाजीनगर - अनेक वर्षांच्या पाठपुराव्यानंतर शहरातील एन-२ च्या एडीसीए मैदानावर भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) डिसेंबरमध्ये 'कूच बिहार करंडक' आणि जानेवारी, फेब्रुवारी महिन्यात 'सी. के. नायडू करंडक'चे सामने खेळवले जाणार आहेत. यापूर्वी शहरात दहा वर्षांपूर्वी दिलीप करंडकचा सामना झाला होता.

बीसीसीआयतर्फे १९ वर्षांखालील वयोगटात कूच बिहार करंडक व २३ वर्षांखालील वयोगटात सी. के. नायडू करंडक या स्पर्धा घेतली जाते. या स्पर्धा छत्रपती संभाजीनगर शहरातील मैदानावर खेळल्या जाव्यात यासाठी जिल्हा क्रिकेट संघटनेचे सचिव सचिन मुळे यांनी राज्य क्रिकेट संघटनेकडे अनेक वेळा पाठपुरावा केला होता.दरम्यान, एन -२ च्या एडीसीए मैदानावर डिसेंबरमध्ये कूच बिहार करंडक तर जानेवारी, फेब्रुवारी महिन्यात सी. के. नायडू करंडकचे सामने खेळले जाणार आहेत. यामुळे शहरातीलच नव्हे तर मराठवाड्यातील क्रिकेट खेळाडू व प्रेमींना एक मोठी संधी निर्माण झाली आहे. या सामन्यांमुळे शहरातील क्रिकेटला एक नवसंजीवनी मिळणार असून, यात उदयोन्मुख खेळाडूंना प्रोत्साहन मिळणार आहे.



ग्रामपंचायत सदस्य डॉ.दुशंत येवले यांच्या आंदोलनामुळे बांधकाम विभाग खडबडून जागे

## डोगरकिंन्ही घाटात आंदोलन करताच घाटातील खड्डे बुजवन्याच्या कामला सुरवात

पाटोदा (दत्ता वाघमारे)

पाटोदा तालुक्यातील डोंगरकिन्ही घाटातील रस्त्याचे काम सुरू करान्यात यावे म्हणून डोगरकिन्ही येथील सत्तेतील पक्षाच्या कार्यकर्त्यांनी ठीय्या आंदोलन केल्यानंतर पैठण पंढरपूर या राष्ट्रीय महामार्गावरील पाटोदा तालुक्यातील डोंगरकिन्ही जवळील मळेकरवाडी येथील घाट रस्ता अत्यंत खराब झालेल्या व प्रवास करताना जिवघेना ठरत होता.सहकाऱ्यांच्या सोबतीने आंदोलन केल्यानंतर सररील घाटातील रस्त्यावरील खड्डे बुजवन्याचे काम तात्काळ सुरू करण्यात आले.याबाबत सविस्तर वृत्त असे की पाटोदा तालुक्यातील पैठण पंढरपूर मार्गावर असलेल्या डोंगरकिंन्ही घाटात रस्ता अत्यंत धोका दायक झाल्याने वाहन चालकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत असल्यामुळे डोंगरकिन्ही गावचे ग्रामपंचात सदस्य दुंशात येवले व ग्रामस्थ यांनी महामार्गाचे काम चालू व्हावे म्हणून आंदोलन केल्यानंतर बांधकाम विभाग खडबडून जागे झाले व त्यांनी तात्काळ डोगरकिंन्ही घाटातील रस्त्याचे काम तात्काळ चालू केले यावेळी आंदोलन करते सहभागी ग्रामस्थ डॉ दुशंत येवले,पांडुरंग म्हस्के,पप्पु मांडवे,अतुल दळवी, संतोष नाना येवले,संतोष राऊत,

दादा येवले,काकडे आप्पा, अमोल चव्हाण,अमोल येवले पत्रकार,अभिमान मळेकर,बाप्पु रायते माजी सरपंच,पुरूषोत्तम येवले,गणेश म्हस्के इत्यादी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्ह्याच्या ठिकाणचा शासन आपल्या दारी कार्यक्रम परळीत म्हणजे

# कृषीमंत्री धनंजय मुंडेचा तुघलकी कारभार:- डॉ.गणेश ढवळे

बीड:- बीड जिल्ह्यात दुष्काळ असताना व जिल्हा परीषदेच्या शाळा मोडकळीस आलेल्या असताना त्यांना निधी न देता तसेच जिल्ह्यातील पत्रकारांची भुसंपादनाची जाहिरात बिले न देता कोट्यवधींचा निधी शासन आपल्या दारी साठी खर्च करत जिल्ह्याच्या ठिकाणी कार्यक्रम घेण्याऐवजी तालुक्याच्या ठिकाणी कार्यक्रम घेण्याच्या कृषिमंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री बीड धनंजय मुंडे यांचा मनमानी कारभार करत असुन यांच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली दि.२८.११.२०२३ महात्मा ज्योतिबा फुले स्मृतीदिनी मंगळवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, उपमुख्यमंत्री यांना दिले आहे. निवेदनावर शहर प्रमुख शेख युनुस यांची स्वाक्षरी आहे.जिल्ह्याच्या ठिकाणी होणारा कार्यक्रम तालुक्याच्या ठिकाणी घेणा-या पालकमंत्री बीड धनंजय मुंडे यांच्या तुघलकी कारभाराचा निषेध मुख्यमंत्री तसेच उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत होणारा शासन आपल्या दारी हा कार्यक्रम बीड जिल्ह्याच्या ठिकाणी घेणे अपेक्षित असताना पालकमंत्री बीड धनंजयजी मुंडे यांनी तो परळी याठिकाणी घेण्याचा घातलेला घाट व



यामुळे ईतर तालुक्यातील लोकांची गैरसोय हा त्यांचा तुघलकी कारभाराचे प्रतिक असुन आम्ही बीडकर यांचा निषेध करत आहोत.

धोकादायक ज्ञानमंदिरांना निधी नाही मात्र शासन आपल्या दारी साठी कोट्यवधींचा खर्च बीड- जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळा म्हणजेच ज्ञानमंदिरे धोकादायक असुन( गेवराई तालुक्यातील गंगावाडी येथील जिल्हा परिषद शाळेची इमारत पडली असुन विद्यार्थ्यांना मारूतीच्या मंदिरात ज्ञानार्जन करावे लागत आहे याविषयी प्रशासनाला वारंवार निवेदने देऊन आंदोलने सुद्धा केली आहेत.) त्यांना पुनः बांधणी व दुरूस्तीसाठी निधींची कमतरता असल्याचे कारण पुढे केले जाते मात्र शासन आपल्या दारी कार्यक्रमासाठी बीड जिल्ह्यातील कार्यक्रमासाठी केवळ मंडळासाठी २ कोटी,जेवणावळी २ कोटी,परीवहन महामंडळ दीड कोटी असा एकुण ५ कोटींच्या घरात खर्च करून शासनाची भूमिका दुटप्पीपणाची दिसुन येत आहे.

बीड जिल्ह्यातील विविध भुसंपादन कार्यालयामार्फत जिल्ह्यातील वृत्तपत्रांना शासकीय प्रकल्प राबविण्यासाठी भुसंपादित करण्याकरीता शासकीय जाहिराती देण्यात येतात.मागील काही वर्षांतील आणि चालु कालावधीतील अनेक रोजगार हमी योजना भुसंपादन जाहिरातीची वृत्तपत्रांची देयके केवळ यंत्रणांच्या निष्काळजी पणामुळे प्रलंबित राहिली असुन एकुण रक्कम २ कोटी रुपयांपर्यंत असुन अनेकदा मागणी करूनही देण्यात आली नाहीत .दि.१५ आगस्ट २०२० रोजी संबंधित प्रकरणी संपादकांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले होते तेव्हा तत्कालीन पालकमंत्री बीड धनंजयजी मुंडे यांनी प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले होते.परंतु प्रश्न मार्गी लागला नाही.दि.०४ आक्टोबर २०२३ रोजी संपादकांनी मुंबई येथे पालकमंत्री धनंजयजी मुंडे यांची भेट घेऊन निवेदन देत विनंती केली होती मात्र तेव्हा सुद्धा बैठक लावुन प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले होते.परंतु अद्याप कोणतीही उपाययोजना करण्यात आली नाही त्यामुळे संपादकांनी दि.१ डिसेंबर २०२३ रोजीच्या शासन आपल्या दारी परळी येथील तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्या संदर्भात प्रशासनाला निवेदन दिले आहे.त्यामुळे हा प्रश्न प्रलंबित देयके देऊन तातडीने निकाली काढण्यात यावा.

## माजलगाव तहसील कार्यालयात पोलीस पाटील पदाचे आरक्षण सोडत

बीड :बीड जिल्हयातील सर्व उपविभागातील पोलीस पाटील रिक्त पदे भरण्याबाबत कालबध्द कार्यक्रम जाहीर झाला असून कालबध्द कार्यक्रमाच्या अनुषंगाने माजलगाव उपविभागातील संबंधित गावातील रिक्त असलेल्या पोलीस पाटील पदाचे गावनिहाय आरक्षण जाहीर करावयाचे आहे.

माजलगाव उपविभागातील माजलगाव, धारुर, वडवणी या तीन तालुक्यामध्ये मिळून एकूण १९३ पोलीस पाटील यांचे पदे रिक्त असून ज्या गावातील पदे रिक्त आहेत ते विचारात घेवुन लोकसंख्येच्या टक्केवारी आधारे प्रवर्ग निहाय आरक्षण व त्यामधून ३० टक्के महिला आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे.

सदर प्रवर्ग निहाय आरक्षण दि. ६ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता तहसील कार्यालय माजलगाव येथील बैठक हॉलमध्ये काढण्याचे निश्चित केले असून पोलीस पाटील पद रिक्त असलेल्या गावातील नागरीकांनी आरक्षण सोडतीस उपस्थित राहता येईल, असे माजलगावचे उपविभागीय कार्यालयाचे, उपविभागीय दंडाधिकारी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.



वाचासिद्ध तथा सनातन धर्म प्रसारक स्वामी रामल्ला सरकार यांचे बीड येथे नुकतेच आगमन झाले. स्वामींच्या पाद्य पुजनाचा तथा स्वागत, सत्काराचा कार्यक्रम आमच्या सुविद्य काकु श्रीमती सौ. संगिताताई महादेव जायभाये यांच्या वतीने त्यांच्या घरी भक्ति कंस्ट्रक्शन येथे आयोजित करण्यात आला होता.यावेळी, श्री.नितिनजि जायभाये , श्री. नारायण नागरे नाना, श्री.किरण चव्हाण,श्री शैलेश गिते श्री. उद्धव जायभाये, श्री.कुलकर्णी काका, श्री.मंकले काका, श्री जोशी काका, श्री.कोनार्डे काका, श्री.देशपांडे काका, श्री.देशमुख काका, श्री.सुनिल सानप, श्री पाटील, श्री माळी ,श्री काळे आदी मान्यवरांनी उपस्थित राहुन सहकार्य केले.होते.

दिवाळीचा आनंद ओसरला..!

## दुष्काळी स्थितीमुळे रोजगारासाठी अनेकांनी धरला शहरांचा रस्ता

टाकरवण ।राम आडागळे

दिवाळीसाठी मोठ्या आनंदाने सासरहून माहेरी आलेल्या लेकीबाळी आता परतीच्या मार्गावर आहेत. यंदा दुष्काळसदृश स्थितीमुळे शेतकरी, सामान्य आर्थिक अडचणीत आहेत. अशा स्थितीत दिवाळीचा सण साजरा करण्यात आला. सर्वजण कामासाठी शहराचा रस्ता आता धरत आहेत. तर सुटीसाठी गावाकडे आलेले परतीच्या मार्गावर आहेत. ग्रामीण भागातील दिवाळीचा आनंद ओसरल्याचे चित्र आहे.

यावर्षी पावसाअभावी दुष्काळसदृश स्थिती आहे. तालुक्यात खरिपात पावसाअभावी विविध पिकांचे उत्पादन घटल्याने शेतकरी कुटुंबीय आर्थिक अडचणीत सापडले आहेत.त्यातच शासनाची मदत अद्यापही पोचलेली नाही. दुसरीकडे दिवाळी, लक्ष्मीपूजन, भाऊबीज असे एकामागून एक दिवस कधी गेले हे कोणालाही कळले नाही. आता परगावचे लोक परतीच्या मार्गावर आहेत. तर अनेकजण रोजगारासाठी गाव सोडत आहेत. एसटी बसस्थानके, बसथांब्यावर सकाळपासूनच मोठी गर्दी होत असल्याचे चित्र पाहावयास मिळू लागले आहे. पुणे, मुंबईकडे जाणाऱ्या खाजगी ट्रॅव्हल्सला गर्दी होत असून तिकिटही वाढले आहे.

यंदा पावसा अभावी खरिपातील मुग, उडिद कापूस ,तुरी सह सोयाबीनचे उत्पन्न घटले. शेतात केलेला खर्च निघणे कठीण झाले. दिवाळीपूर्वी पीकविमा मिळण्याची आशा होती पण तो मिळाला नाही. त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत आहे. दिगांबर कचरे

### शेतकरी राजेगांव

तालुक्यात अत्यल्प उत्पादनामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत आहेत. हाताला काम मिळण्यासाठी बाहेरगावी असणारे ग्रामीण भागातील अनेकजण दिवाळीच्या निमित्ताने पुणे मुंबई सारख्या शहरातून गावाकडे येतात. भेटीगाठी, संवाद यामुळे वातावरण आनंदी असते. बाजारपेठही गजबजते. परंतु या आठवड्यात अनेकजण परतीच्या मार्गावर असून आता दिवाळीचा आनंद खेडेगावातून ओसरत असल्याचे दिसत आहे.



माजलगांव येथे होणाऱ्या इज्तेमाला माजी सभापती नितीनदादा नाईकनवरे यांनी भेट दिली यावेळी माजी नगराध्यक्ष साहल भैया चाऊस,नासेर भाई खान, मज्जिद भाई शेख,नवाब भाई पटेल,जफर मिर्झा, चांद भाई,व उपस्थित सर्व बांधव.

## बीड जिल्ह्यातील वंचित घटकाने लाभ उचलावा मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक

बीड : विकसित भारत संकल्प यात्रा या अंतर्गत बीड जिल्ह्यात पुढचे ६० दिवस ९ चित्ररथ ११ तालुक्यात फिरणार आहेत. याचा लाभ जिल्ह्यातील वंचित घटकाने उचलावा, असे आवाहन जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक यांनी या चित्ररथांना हिरवा झेंडा दाखवून उद्घाटन करते प्रसंगी केले.

आज जिल्हा परिषद परिसरात विकसित भारत संकल्प यात्रा या उपक्रमातंर्गत तळागळातील जनतेला शासकीय योजनेचा लाभ मिळावा, यासाठी चित्ररथाच्या माध्यमातून प्रचार प्रसार उपक्रम राबविला जात आहे. बीड जिल्ह्यातील शासकीय योजनांपासून वंचित घटाकांनी या मोहीमेच्या माध्यमातून लाभ उचलावा यासाठी ११ तालुक्यात ९ चित्ररथ पुढील ६०दिवस फिरणार आहेत. या चित्ररथात मोठया स्क्रीनवर लोकांशी निगडीत योजनांची माहिती दाखविली जाणार आहे. ज्यांना ज्या योजनांचा लाभ घेणे आहे, त्यांनी त्या संदर्भात चित्ररथासोबत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना विचारून योजनांचा लाभ कसा उचलता येईल ती माहिती जाणुन घ्यावी, असे श्री पाठक यावेळी म्हणाले.

यावेळी चित्ररथाच्या उद्घाटनाप्रसंगी प्रकल्प संचालक तथा विकसित भारत संकल्प यात्रेच्या नोडल अधिकारी संगीता देवी पाटील, अपर मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोंळकी, उपजिल्हाधिकारी श्री. सुर्यवंशी उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. डी.एम. मोडक, गट विकास अधिकारी उदय सांळुके यांच्यासह शासकीय अधिकारी कर्मचारी तसेच या संकल्प यात्रेत सहभागी असणारे कर्मचारी वृंद यावेळी उपस्थित होते.

संकल्प यात्रेची उद्दिष्टे

राज्यभरात विकसित भारत संकल्प यात्रा या संकल्प यात्रेचे आयोजन दिनांक १५ नोव्हेंबर २०२३ ते दि. २६ जानेवारी २०२४ या कालावधीत करण्यात आलेले असुन बीड जिल्हयामध्ये सदर मोहिम ही दिनांक २२ नोव्हेंबर २०२३ ते २२ जानेवारी या कालावधीत आयोजन केलेले आहे. सदर मोहिमेअंतर्गत विविध योजनांतर्गत पात्र असलेल्या आतापर्यंत लाभ न घेतलेल्या लोकांपर्यंत पोहचणे, योजनेच्या माहितीचा प्रसार व जागरुकता निर्माण करणे, नागरिकांशी / लाभार्थ्यांशी संवाद साधणे व यात्रे दरम्यान निश्चित केलेल्या तपशीलाद्वारे संभाव्य लाभार्थ्यांची नोंदणी करणे व मोहिमेअंतर्गत झालेल्या कार्यवाहीची माहिती विकसित भारत संकल्प यात्रा मोहिमेच्या संकेतस्थळावर दररोज अद्यावत करणे ही या संकल्प यात्रेची उद्दिष्टे आहेत.

# वकिलांच्या वादामुळे सुनावणीला विलंब

## तुमच्यामुळे उशीर होईल हे मला सुप्रीम कोर्टाला सांगावे लागेल, नार्वेकरांचा वकिलांना इशारा

मुंबई /प्रतिनिधी

शिवसेना आमदार अपात्रतेप्रकरी आज सलग तिसऱ्या दिवशी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यापुढे मॅरेथॉन सुनावणी झाली. आजच्या सुनावणीत शिवसेनेच्या ठाकरे व शिंदे गटाच्या वकिलांत चांगलेच वाक्युद्ध रंगले. यामुळे सुनावणीचा काही वेळ वाया गेला. यामुळे संतापलेल्या नार्वेकरांनी दोन्ही गटाच्या वकिलांना तुमच्यामुळे उशीर होईल हे मला सुप्रीम कोर्टाला सांगावे लागेल, असा इशारा दिला.

शिवसेना आमदार अपात्रतेवरील गुरुवारच्या सुनावणीत शिंदे गटाचे वकील महेश जेठमलानी यांनी ठाकरे गटाचे प्रतोद सुनील प्रभू यांच्यावर प्रश्नांची सरबत्ती केली. त्याला सुनील प्रभू यांनीही शिताफीने उत्तर देण्याचा प्रयत्न केला. पण काही प्रश्नांवर ते गोंधळलेले दिसून आले.

तुमच्यामुळे सुनावणीला उशीर

ही सुनावणी गत २१ तारखेला सुरू झालेल्या या सुनावणीत सुरुवातीपासूनच जेठमलानी आणि सुनील प्रभू यांच्यात खंडाजंगी होताना दिसून येत आहे. पहिल्या दिवशी इंग्रजी भाषेच्या मुद्द्यावरुन आणि त्यानंतर काल व्हिपवरुन या दोघांमध्ये चांगलीच जुंपली. आज तिसऱ्या दिवशीही त्याची प्रचिती आली. या दोघांतील वादानंतर शिंदे व ठाकरे या शिवसेनेच्या दोन्ही गटाच्या वकिलांतही चांगलेच वाक्युद्ध रंगले. त्यामुळे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दोघांनाही समज दिला. तुमच्यामुळे सुनावणीला उशीर होईल, हे मला सुप्रीम कोर्टाला सांगावे लागेल, असे ते म्हणाले.

दोन्ही पक्षकार वकील युक्तिवाद करताना विनाकरण वाद घालत आहेत. यामुळे लवादाचा वेळ वाया जात आहे. त्यांच्यातील वादाचा परिणाम वेळकाढूपणामध्ये होत आहे. हे मी रेकॉर्डमध्ये नोंद करत आहे. मला ठराविक वेळेत हे प्रकरण निकाली काढायचे आहे, असेही त्यांनी या प्रकरणी वकिलांना बजावले.

गुरुवारच्या सुनावणीत शिंदे गटाचे वकील महेश जेठमलानी यांनी ठाकरेंचे प्रतोद सुनील प्रभू यांच्यावर व्हिपची खोटी कागदपत्रे सादर करण्याचा आरोप केला. असा कोणताही व्हिपचा मेसेज तुम्ही पाठवला नाही, असे ते म्हणाले. त्यावर प्रभू यांनी मी व्हिपचा मेसेज पाठवल्याचे संविधानाच्या शपथेवर सांगितले.

व्हिप पाठवण्यात आला नसल्याचा आरोप

सुनील प्रभु यांनी व्हिपचा मेसेज मनोज चौगुले नामक व्यक्तीच्या मोबाइलवरुन पाठवल्याचे सांगितले. त्यावरही जेठमलानी यांनी आक्षेप घेतला. तसेच त्यांच्या मोबाइलवरून मेसेज पाठवण्यात आला असेल, तर त्यांचा मोबाईल रेकॉर्डवर का घेतला नाही, असा सवाल उपस्थित केला. मनोज चौगुले यांचा या ठिकाणी साक्षीदार म्हणून उल्लेख नाही. त्यामुळे व्हिपचा मेसेज कोणत्याही आमदाराला पाठवला नाही हे स्पष्ट होते, असे ते म्हणाले.जेठमलानी यांच्या या भूमिकेवर सुनील प्रभु यांनी त्यांचा आरोप साफ खोटा असल्याचे स्पष्ट केले. तेवढ्यात ठाकरे गटाच्या कनिष्ठ वकिलांनी जेठमलानी यांच्या भूमिकेवर आक्षेप घेतला. त्यावर जेठमलानी संतापले. त्यानंतर देवदत्त कामत व जेठमलानी यांच्यात वैयक्तिक पातळीवर जुंपली. तेव्हा अध्यक्षांनी हस्तक्षेप करत वातावरण शांत केले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT